दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३२२ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.२ सप्टेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या घोषणा



# शिवरायांचा पुतळा कोसळल्याने महायुती सरकार विरोधात ठाकरे-पवारांचं 'जोडे मारो' आंदोलन

## मुंबईत ठाकरे-पवारांसह शेकडो कार्यकर्त्यांचा उग्र निदर्शने

» महाराजांचा पुतळा हवेतून कसा पडला?

» पुतळ्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे.

» मूर्ती बनवण्याचा नियम आहे, परवानगी घ्यावी लागत

» पुतळ्याचा अवमान सहन करणार नाही

**मुंबई (वृत्तसंस्था) -सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावर उभा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कोसळण्याच्या घटनेमुळे महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर घटनेच्या निषेधार्थ, महाविकास आघाडीने आज (३१ ऑगस्ट) मुंबईत भव्य जोडे मारो आंदोलन आयोजित केले. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा प्रतीक असलेल्या शिवरायांच्या पुतळ्याची अशा प्रकारे अवहेलना झाल्यामुळे आघाडीच्या नेत्यांनी राज्य सरकारवर भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणाचे आरोप करत रस्त्यावर उतरून आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह तिन्ही पक्षांचे शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले. गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने निघालेल्या या मोर्चात कार्यकर्त्यांनी शिवाजी महाराजांच्या जयघोषासह गद्दार आणि शिवद्रोही यांना माफी नाही, अशा घोषणांनी वातावरण ढवळून निघाले.**





छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे प्रतीक असून त्यांच्या पुतळ्याचा अवमान आम्ही सहन करणार नाही, असे म्हणत महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मुंबईच्या रस्त्यांवर उतरले. जय भवानी, जय शिवाजी या घोषणांनी वातावरण दणाणून गेले. शेकडो कार्यकर्ते गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने चालत निघाले, ज्यात तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

या आंदोलनाला पोलिसांनी आधी परवानगी नाकारली होती, मात्र महाविकास आघाडीच्या दबावामुळे आणि सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे मोर्चाला परवानगी देण्यात आली. सुरुवातीला बॅरिगेट्स लावून मोर्चा अडवण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र कार्यकर्त्यांचा रोष पाहता, नंतर पोलिसांनी बॅरिगेट्स हटवले आणि मोर्चाला गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने जाण्याची मुभा दिली.

उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवाजी महाराजांचा पुतळा हवेतून कसा पडला? राज्यात सत्तेत आलेले सरकार भ्रष्टाचारात गढले आहे. स्मारकाच्या कामात कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला आहे, आणि पुनर्बांधणीच्या नावाखाली करोडोंचा भ्रष्टाचार होणार आहे. मी त्यांना शिवाचे गद्दार म्हणेन.

शरद पवार म्हणाले की, पुतळ्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. राज्य सरकार आपल्या जबाबदारीपासून पळ काढू शकत नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सिंधुदुर्गात पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी स्वत: पंतप्रधान मोदी, संरक्षणमंत्री आणि मुख्यमंत्री आले होते. मूर्ती बनवण्याचा नियम आहे, परवानगी घ्यावी लागते. हे शिवविरोधी लोक आहेत. सरकारच्या चुकीच्या धोरणांचे कारण आणि डीजी पदावर महिला अधिकाऱ्याची नियुक्ती का करण्यात आली आहे? डीजी रश्मी शुक्ला भाजप आणि आरएसएसचा अजेंडा चालवत आहेत. या आंदोलनामुळे राज्यभरात आक्रोशाची लाट उफाळली असून, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. यामुळे आगामी काळात सरकारविरोधातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


## वर्धा जिल्ह्यात आजोबा-नात नाल्यात वाहून गेले

**अल्लीपूर । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील चाणकी कोरडे येथे नाल्याला आलेल्या पुरात आजोबा आणि नात वाहून गेले. ही धक्कादायक घटना शनिवार, ३१ ऑगस्ट रोजी रात्री घडली.मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री अचानक मुसळधार पाऊस सुरू झाला. चाणकी कोरडे येथील लाला सुरपाम (५०) आणि त्यांची नात सायरा साठोने (९) हे कानगाव येथून बाजारातून परत येत असताना मुसळधार पावसामुळे नाल्यात पूर आला. पुलावरील पाण्याचा अंदाज न आल्याने, पुराच्या पाण्यात दोघेही वाहून गेले.नाल्यावरील पूल जीर्ण झाला आहे आणि पुलाची उंची कमी आहे. नवीन पूल बांधण्याची मागणी अनेक वर्षांपासून परिसरातील नागरिकांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना केली आहे.आजोबा आणि नात वाहून गेल्याची माहिती कळताच, अल्लीपूर येथील ठाणेदार प्रफुल डाहूले यांनी तातडीने कार्यवाही केली. वर्धा येथील एनडीआरएफच्या टीमला पाचारण करण्यात आले आहे. वाहून गेलेल्या आजोबा व नातीचा शोध सुरू आहे.

# पावसामुळे घराची भिंत कोसळून दांपत्याचा दुर्दैवी मृत्यू

## मुलींच्या डोक्यावरून आई-वडिलांचा हात गेला





**मूल । प्रतिनिधी**

सततच्या मूसळधार पावसामुळे फिस्कुटी गावात एक हृदयद्रावक घटना घडली. जीर्ण झालेली भिंत कोसळून अशोक रघुनाथ मोहुर्ले (वय ५२) आणि त्यांची पत्नी लता मोहुर्ले यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना संपूर्ण गावासाठी एक मोठा आघात ठरली आहे.

तय्यूब खा पठाण यांच्या घराची भिंत खूप जुनी झालेली होती. दुर्लक्षामुळे ती भिंत कोसळली, ज्यामुळे शेजारील मोहुर्ले दांपत्याचा मृत्यू झाला. घटना घडली त्यावेळी अशोक आणि लता मोहुर्ले आपली दैनंदिन कामे करत होते. भिंत कोसळल्याच्या आवाजाने गावकरी तात्काळ मदतीसाठी धावले, पण अत्यंत प्रयत्नांनंतरही अशोक मोहुर्ले यांचा रुग्णालयात नेत असताना



मृत्यू झाला. लता मोहुर्ले यांना गंभीर अवस्थेत चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले, परंतु दुर्दैवाने त्यांचाही मृत्यू झाला.

अशोक आणि लता मोहुर्ले यांना चार मुली होत्या, आणि चारही मुलींचे लग्न झाल्यामुळे ते दोघेच घरी राहत होते. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. त्यांच्या मृत्यूने मुलींच्या डोक्यावरून आई-वडिलांचा हात गेला आहे, ज्यामुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. घटनेनंतर गावकऱ्यांनी तात्काळ नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे. मूल पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन तक्रार दाखल केली असून, पंचनामा करत असताना गावातील सरपंच नितीन गुरनुले उपस्थित होते. तलाठी गजभिये यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. अत्यंत दु:खद वातावरणात मोहुर्ले दांपत्याचा अंत्यसंस्कार सायंकाळी ४ वाजता करण्यात आला.

## वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

**मूल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील गुरे चराईसाठी जंगल परिसरात



वाघाने गुराखीवर हल्ला करून त्याला ठार केले. ही घटना २ सप्टेंबरच्या दरम्यान गुलाब हरी येळमे (वय अंदाजे ५२) यांच्या जंगल परिसरात घडली.गुलाब हरी येळमे आपल्या गुरांना जंगलात घेऊन गेले होते. गुरे चरवित असताना, झुडपात दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक गुलाब हरी येळमे यांच्यावर हल्ला करून त्याला जंगलात ओढत नेले. घटनेची माहिती गावात मिळताच गावकऱ्यांनी जंगलाच्या दिशेने धाव घेतली. वनविभागाला माहिती देण्यात आली असून, वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते .

# कृषीप्रधान संस्कृती आणि बैलपोळा

**भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे येथे शेती आणि शेतींशी संबंधित विविध कृषी परंपरांचा सन्मान केला जातो. त्या परंपरा विधिवत पाळल्या आणि पुजल्या जातात. यापैकीच एक महत्वाचा सण म्हणजे बैलपोळा होय. हा सण श्रावण महिन्यात म्हणजेच ऑगस्ट महिन्यामध्ये येतो. पिठोरी अमावस्येला हा सण येत असल्यामुळे काही ठिकाणी पिठोळ्यांची पूजा करतात. कृषी जीवनामध्ये बैलपोळा या सणाचे मौलिक असे महत्त्व आहे. खेडेगावामध्ये आजही हा सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला जातो. केवळ खेड्यातच नाही तर भारताच्या विविध राज्यात हा सण त्यांच्या संस्कृतीप्रमाणे आनंदमय वातावरणात साजरा होतो. भारत कृषिप्रधान देश असल्यामुळे येथे बैल, गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या इत्यादी शेतीवर अवलबून असणाऱ्या प्राण्यांचे खूप महत्व आहे. शेती व्यवसायात बैल हा मौलिक प्राणी आहे. शेती व्यवसाय सपूणंतः बैलांवर अवलंबून असल्यामुळे त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विदर्भात मोठया प्रमाणावर साजरा होणारा हा बैलपोळा विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्यप्रदेश व तेलगणा भागातसुद्धा उत्साहात साजरा होतो. या सणाच्या निमित्ताने बैल आणि शेतकरी यांच्यातील ऋणानुबंध भावनिकदृष्ट्या जपल्या जातो.**

वर्षभर प्रतिक्षारत असलेल्या या सणाच्या निमित्ताने शेतकरी कुटुंबामध्ये उत्साहाचे वातावरण असते. बैलांना मानसन्मान दिला जातो. या सणाच्या निमित्ताने एकतरी दिवस बैलांना विश्रांती मिळावी म्हणून त्यांना शेतीच्या कामापासून दूर ठेवले जाते. पोळ्याच्या दिवशी बैलांना कोणत्याही प्रकारचे शेतीचे काम करू दिल्या जात नाही. पूर्णतः सुटी दिली जाते. बैलपोळ्याच्या आदल्या दिवशी वाटबैल म्हणजे ज्या शेतकऱ्यांकडे बैल नाही, शेती नाही ते मातीच्या बैलांची पूजा करतात. ज्यांच्याकडे बैल आहे ते बैलांच्या खांद्याला पळसाच्या पानांना हळदीचा लेप लावून शेकतात. त्याला आमच्याकडे खांदा शेकणे असे म्हटले जाते.

आज आवतन घे, उद्या जेवायला ये असे म्हणत सन्मानाने विधिवत निमंत्रण दिले जाते. दुसरा दिवस म्हणजे बैलपोळा. आजच्या दिवशी बैलांना आंघोळ घातली जाते. धुऊनपुसून त्यांना स्वच्छ केले जाते. घासपूस करून शेतकरी प्रेमाने त्यांची सेवा करतात. बैलांना रंगीबेरंगी वस्त्रांनी सजविले जाते. त्यांच्या पाठीवर विविध नक्षीकाम केलेली झुल चढवतात. सर्व अंगावर ठिपके देऊन शिंगांना रंगवतात. बाशिंग बांधतात. काही ठिकाणी शेतकरी आपल्या बैलांच्या पाठीवर रंगकाम करून त्याला सजवतात. गळ्यात घुगरांच्या माळा, शिंगाला चवर बांधले जातात. या बैलांची वर्षभर निगा राखणाऱ्या घरगड्याला नवीन कपडे घेऊन दिले जाते. अशी सजवलेली रंगीबेरंगी बैलजोडी गावातील सार्वजनिक ठिकाणी जिथे पोळा भरतो तिथे वाजतगाजत नेली जाते. तिथे गावातील सर्व शेतकरी आपापल्या बैलांना सजवून आणतात. आनदी व उत्साही वातावरणात सामूहिकपणे 'झडत्या' म्हटल्या जातात. ग्रामीण भागात झडत्यांशिवाय पोळा नाही. झडत्या हे पोळ्याचे विशेष वैशिष्ट्ये आहे. असे सांगतात की, गाई शिवाय गोरा नाही आणि झडत्या शिवाय पोळा नाही याप्रमाणे हा झडत्यांचा जोशपूर्ण कार्यक्रम चालू होतो. झडत्यांच्या माध्यमातून सवाल जवाब झडतात. महाराष्ट्राच्या विविध लोककलांपैकी पोळ्याची झडती ही लोककला आजही ग्रामीण भागातील निरक्षर असो की साक्षर शेतकऱ्यांच्या मुखावर साम्राज्य गाजवित आहे. अनेकदा या झडत्याच्या माध्यमातून एकमेकांची कुरघोडी केली जाते. एका विशिष्ट स्टाईलने म्हटलेल्या या झडत्या उपस्थित शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर काही काळ का असेना आनंद फुलवण्याचे काम करतात. या झडत्यातून शासन व्यवस्था व सामाजिक जीवनातील जीवन व्यवहार यातील उखाळ्या पाकाळ्या काढून रंजन, मनोरजन केले जाते.

**आभाळ गडगडे**
**शिंग तडतडे**
**शिंगात भरले हो खडे**
**खडे गेले चौरूगुणा**
**चौरूगुणाची आणली माती**
**ती दिली पंचाच्या हाती**
**पंचानी बनवला गणपती**
**तो बांधला बैलाच्या मस्तकी**
**मागेहुन दिसे धवळा पिवळा**
**समोरून दिसे नितनवरा**
**असला गुरु पुरा मार**
**लंकमधी हुडा**
**एक नमन गौरा पार्वती**
**हर बोला हर बोला महादेव**

अशाप्रकारे झडत्यांच्या वातावरणामध्ये सार्वजनिक बैलपोळा थाटात सपन्न होतो. उत्साहात साजरा केला जातो. नंतर या बैलजोडीला वाजतगाजत घरी आणले जाते. घरातील माऊली त्यांची पाय धुऊन पूजा करते. गोडधोड नैवेद्य, पुरणपोळीसह वेगवेगळ्या पदार्थाचे पक्वान्न खाऊ घालतात. बैलांची गावभर मिरवणूक काढली जाते. या दिवशी ग्रामीण भागात जोशपूर्ण वातावरण असते. काही सार्वजनिक पोळ्यामध्ये बैलांच्या सजावटीसाठी बक्षीसांचेहीआयोजन केले जाते. अलिकडे पोळ्यात होणारे बैलांच्या सजावटीचे प्रयोग बघून माणसाने हा सण देखील आपल्या फायद्यासाठी बनवून घेतला आहे काय असे वाटायला लागलेले आहे. बालपणी केलेले संस्कार है पुढे फार उपयुक्त असतात. माणूस जेव्हा मोठा होतो. तेव्हा बालपणीच्या संस्काराची शिदोरी आयुष्यभर त्याच्या कामी पडत असते. कदाचित ही भावना लक्षात घेत आपल्याकडे मोठ्या बैलपोळ्या सोबतच तान्ह्या पोळ्याची परंपरा आली असावी. छोट्या बालमनावर संस्कार करण्यासाठी दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा साजरा केला जातो. या दिवशी छोटी बालकं लाकडापासून बनवलेले



आपले सजवलेले बैल घेऊन सार्वजनिक तान्हा पोळ्यामध्ये येतात. नवीन वस्त्र परिधान करून आलेली ही बालकं पोळ्याच्या स्पर्धामध्ये सहभागी होतात. त्यासाठी आपल्यापरीने पालकांच्या साह्याने नंदीबैलाला सजवले जाते. या छोट्या छोट्या आठवणीतून त्याची व्यक्तिमत्व घडत असतात. पुढे हेच संस्कार आपली कृषी परंपरा कायम ठेवण्यासाठी उपयोगी येणारे आहेत. आजकाल शेतीमध्ये नवनवीन उपकरणे उपलब्ध झालेली आहेत. त्यामुळे शेतीमध्ये बैलांचा वापर जो पूर्वी मोठ्या प्रमाणात व्हायचा.अलिकडे बदलत्या काळानुसार काही पर्याय नसल्यामुळे फक्त गरीब शेतकरीच बैलांचा वापर करतात. वाढत्या तांत्रिक उपकरणांमुळे हळूहळू शेतीच्या कामांमध्ये बैलांचा वापर कमी होऊन ट्रॅक्टरसारखी आधुनिक अवजारे वापरात वाढली आहेत. त्यामुळे पुढे भविष्यात बैलांचे महत्त्व टिकून राहील की नाही याविषयी साशंकता वाटते. पर्वी जेव्हा बस, ट्रेन, चारचाकी , दुचाकी इत्यादी वाहतुकीची साधने नव्हती. त्यावेळी माल व माणसे वाहून नेण्यासाठी आणि प्रवासाचे साधन म्हणून बैलगाड्याचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये व्हायचा. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बैलाच्या सहाय्याने वाहतूक मोठ्या प्रमाणावर व्हायची. बैल शेतकऱ्यांचा चांगला मित्र आहे असे समजले जाते. तो घरगुती प्राणी आहे. त्याच्या साहाय्याने शेतातील नांगरणी, मालाची वाहतूक आणि दळणवळण केले जायचे. अजूनही अनेक गावांमध्ये रेंगी, दमणी, छकडा, बैलगाड्या, खासर अजुनही दिसतात. आधुनिक काळात प्रगत कृषी यंत्राच्या शोधामुळ पारंपारिक कृषी साधनाचा वापर सातत्याने कमी होत आहे. खर्चाच्या दृष्टीने शेतीमध्ये बैलाचा वापर खूप कमी होतो. हिरवा कोरडा चारा खाऊन तो शेतकऱ्याच्या प्रत्येक कामात पूर्ण सहकार्य करतो. गाय, बैलांचे शेण जमिनीच्या सुपीकतेला मदत करते. चागल्या पिकाच्या उत्पात गाय, बैलाचे सेंद्रिय खत उपयुक्त ठरत आहे.हिंदू धर्मामध्ये गाईला आणि बैलाला खूप महत्त्व आहे. धामिकदृष्ट्या त्यांना आदरणीय मानले जातात. प्राचीन काळी शेतकरी सर्व शेतीत नांगरणे, सिंचन, वाहतुक इत्यादी शेतीच्या कामांमध्ये बैलांचा वापर करत असत. त्यामुळे ते फार उपयुक्त होते. परतु आजकाल या सर्वे कामाच्यामध्ये वाढत्या जागतिक वापरामुळे म्हातारे बैल भटक्या जनावरासारखे राहतात. देशात लहान मोठ्या शहरांमध्ये गोशाळा स्थापन करण्यात आलेल्या आहे. परंतु संसाधनाची कमतरता आणि शेतकऱ्यांच्या सहकार्याशिवाय तिथे बैल ठेवणे फार कठीण झाले आहे. बैल भक्ती आणि कष्टात एक अतुलनीय प्राणी आहे. पण काळाने त्याचे महत्व कमी केले. म्हणून त्याचा स्वामी किसान सुद्धा कर्तव्ये आणि निष्ठा विसरून वर्षानुवषे त्यांच्यासोबत जगलेले आयुष्य विसरायला लागलेले आहे. त्यांना कत्तलखान्यात विकत आहे. किमान शेतकऱ्याला बैलासारख्या प्राण्यांचे महत्त्व समजले पाहिजे. त्यांची योग्य काळजी घेतली पाहिजे. जगात झपाट्याने सेंद्रिय शेतीचा अवलंब केल्याने शेतकरी बांधवांनी त्यांचे साथीदार सोडू नये. औद्योगिकदृष्या कितीही आधुनिक संसाधने आली तरी भविष्यात गाय, बैल यांच्या सेंद्रिय खतांशिवाय मनुष्याला भविष्य नाही. एक ना एक दिवस मनुष्याला सेंद्रिय शेतीचे महत्व समजणार आहे. वाढलेली भूक शमवण्यासाठी आपण रासायनिक खतांच्या मागे लागलो असलो तरी पुढे सेंद्रिय शेतीशिवाय जगाला पर्याय नाहीं. त्यासाठी बैल व गाईचे शेण उपयोगी पडणार आहे. गाय बैल शाबुत राहिले तरच सेंद्रिय शेती शाबूत राहील. सेंद्रिय शेतीचे नष्ट होणे म्हणजे मानव जातीच्या आरोग्यावर, भविष्यावर विपरीत परिणामाला निमंत्रण दिल्यासारखे आहे. सुजाण शेतकरी व शेती समर्थक यांनी हा मुद्दा समजून घेतला तरच बैलाचे पर्यायाने आणि शेतीचे महत्व वाढेल.

विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी पोटाची आग मिटविण्यासाठी भूक शमविण्यासाठी माणसाला अन्नच लागणार आहे. आणि हे अन्न निर्माण करण्याची ताकद फक्त आणि फक्त शेतकरी आणि शेती यातच आहे. दुर्दैवाने सरकार कोणतेही आले तरी शेती आणि शेतकऱ्यांप्रती उदासीन आहे असे वारंवार जाणवते. अखिल मानव जातीचे कल्याण खऱ्या अर्थाने करायचे असेल तर सरकार कुणाचेही असो त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्या प्रामाणिकपणे सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे सर्व प्रामाणिक झाले तरच शेती व्यवसायाला भविष्य आहे. अन्यथा शासकीय उदासीन धोरणांमुळे शेती व शेतकरी हे भविष्यात केवळ कागदावर उरतील. हे मानव जातीच्या अधोगतीस कारणीभूत ठरेल. पूर्वी उच्च शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी हे समीकरण होते. आता नोकरीला मोठ्या प्रमाणात महत्त्व प्राप्त झाले असले तरी मानवी जेवणाची गरज लक्षात घेता आता सगळ्यांना शेती व्यवसायाकडेच वळण्याची आवश्यकता आहे.

**–डॉ यशवंत घुमे**

# पोळा सण: सोमवारी लाडक्या बैलांना आंघोळ, तूप आणि हळदीने मालीश; गावागावात उत्साह

**धिरज देवतारे । झडशी**

पूर्वापारपासून शेतकऱ्यांसोबत वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांचा सण पोळा सोमवारी (दि. २ सप्टेंबर) सर्वत्र साजरा केला जाणार आहे. त्याच्या एक दिवस आधी परंपरेनुसार सर्जा-राजाची खांदेमळण रविवारी (दि. १) केली जाणार आहे. लाडक्या बैलांची स्वच्छ आंघोळ घालून आणि तूप व हळदीने मालीश करून सोमवारी त्यांना जेवणाचे आवटन दिले जाईल.

## यांत्रिकीकरणाचा परिणाम

**पूर्वीच्या काळात गावातील प्रत्येक शेतकऱ्याकडे बैलजोडी असे. गेल्या दहा-पंधरा वर्षांत गोधन मोठ्या प्रमाणात नामशेष होत आहे. यांत्रिकीकरणाच्या परिणामामुळे कृषी संस्कृतीच्या मुळावरचा घाव घालत आहे. गोधन संपत असल्याने बैलांची संख्या कमी झाली आहे. १० ते १५ हजार लोकवस्तीच्या गावात बैलजोडीची संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीचे कामे सुलभ झाली आहेत, मात्र बैलविषयक ओलावा कमी झाला नाही.**

शेतकऱ्यांसोबत वर्षभर राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा सण म्हणजे पोळा होय. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना आवटन देण्यात येते. या दिवशी बैलांना नदी, तलाव अथवा घरच्या आंघोळीच्या पद्धतीने स्वच्छ केले जाते. वर्षभर खांद्यावर भार वाहणाऱ्या खांद्याला तूप आणि हळदी लावून नरम केले जाते. त्यानंतर त्याला सजवले जाते. त्यामुळे रविवारी ग्रामीण भागात घराघरात आवटन द्या, उद्या जेवायला या असे सांगणारे आवाज कानी पडतात. मुक्या जिवाला मायेचा ओलावा देणाऱ्या या सांस्कृतिक परंपरेला जपण्याचे हे एक सुंदर उदाहरण आहे. कृषी संस्कृतीचा सर्वोच्च आनंद पोळा सणाने अनुभवायला मिळतो. शेतकऱ्यांच्या मित्र असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी मोठ्या उत्साहात हा सण साजरा करतात. सोमवारी हा सण उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा केला जाणार आहे. या सणानिमित्त शेतकरी आठवडाभर तयारी करतात आणि मोठ्या उत्साहात सण साजरा करतात. पोळा सणाच्या आदल्या दिवशी बैलांना आवटन देण्यात येते. ओढा वा नदीवर नेऊन त्यांना आंघोळ घालण्यात येते. या दिवशी बैलाच्या खांद्यावर हळद आणि तुपाने मालिश केली जाते. त्यावर नक्षीकाम केलेले झूल, स्वर्गावर गेरुचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशीग आणि गळ्यात कवड्या व घुंगरांच्या मण्यांचा सजावटीचा भाग असतो. नवीन वेसण आणि नवीन कासरा, पायात चांदीचे करदोड, तोडे घालून गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद दाखवला जातो. सजावट करून त्याला नवरदेव बनवून पोळ्यातील तोरणा खाली नेले जाते. गावातल्या सर्व बैलजोडी वाजंत्री, सनई, ढोल, तासा वाजवत एकत्र आणले जातात. या वेळेस झडती म्हणजे पोळा सणाची गीत म्हणायची पद्धत आहे. तोरणातून आल्यावर धन्याची मालकीन राशी मांडते आणि त्या राशीवर नैवेद ठेऊन सर्जा-राजाला भरवले जाते.


# ड्रामा ज्युनियर्सच्या धडाकेबाज मंचावर अमरावतीचा यश अनिल वाकळे



**अमरावती**–सरस्वती विद्यालय, विद्यापीठ कॉलनी, एम.आय.डी.सी. रोड येथील विद्यार्थी यश अनिल वाकळे याची झी मराठीच्या 'ड्रामा ज्युनियर्स' या रियालिटी शोसाठी निवड झाली आहे. महाराष्ट्रभरातील १६ प्रतिभावान स्पर्धकांच्या यादीत यश अनिल वाकळे याचा समावेश झाला आहे. या शोचे परिक्षक अमृता खानविलकर आणि संकर्षण कऱ्हाडे आहेत, तर एंकरिंग श्रेया बुगडे करत आहेत. 'ड्रामा ज्युनियर्स' हा शो झी टिव्हीवर दर शनिवार व रविवार रात्री ९.०० वाजता प्रसारित होतो, आणि यामध्ये अमरावतीच्या यश अनिल वाकळे आपल्या अभिनयाने रंग भरणार आहे.

यशने पूर्वी राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धा, युवा नाट्यस्पर्धा आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेतला आहे. त्याने सांस्कृतिक कार्य संचालनालय व्दारा आयोजित २० व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत उत्कृष्ट अभिनयासाठी रौप्य पदक मिळवले आहे. त्याच्या यशाचे श्रेय त्याने शाळेच्या मुख्याध्यापक संजय काळबांडे , संपूर्ण शिक्षक वर्ग, आई-वडील आणि आप्तस्वकीय मित्रपरिवारास दिले आहे.

# महाराष्ट्रातील महत्त्वाचा सण-पोळा
# शेतकऱ्यांचा मित्र सर्जा राजाचा दिवस





**शेषराव राऊत**
**चिमूर प्रतिनिधी**

महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा सण म्हणजे पोळा. शेतकरी राजा या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतो. शेतकऱ्यांचा सखा, मित्र असलेल्या सर्जा-राजाचा हा दिवस खास मानला जातो. पोळ्याच्या दिवशी बैलांना गाडीला किंवा नांगराला जुंपले जात नाही, तर त्यांचे पूजन केले जाते.

पोळ्याच्या पहाटे शेतकरी आपल्या बैलांना नदीवर नेवून त्यांची आंघोळ घालतो, आणि त्यांना घरी आणून वेगवेगळ्या पद्धतीने सजवतो. त्यांच्या अंगाला रंग लावला जातो, शिंगांना रंग लावून त्यांच्या अंगावर झूल टाकली जाते. गळ्यात घुंगराच्या माळा आणि पायातही घुंगरू बांधले जातात. गळ्यामध्ये हार घालतात. शेतकरी आपल्या बैल जोडीला सजविण्याकरिता वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करतात.

पोळ्याच्या दिवशी शेतकऱ्यांमध्ये विशेष उत्साह असतो. आपला बैल आकर्षक दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे साज-श्रृंगार खरेदी करतात. सजवलेल्या बैलांना पोळ्यात सहभागी केले जाते. गावाच्या सीमेवर मोठे आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. त्या तोरणाखाली गावातील संपूर्ण बैल जोड्या वाजंत्री, सनया, ढोल-ताशांच्या गजरात एकत्र आणल्या जातात.

झडत्या (पोळ्यांची गीते) म्हणण्याची पद्धत आहे. त्यानंतर मानवीक बैलजोड्यांसमोरून गुढी फिरवून तोरण तोडले जाते आणि पोळा फुटतो. शेतकरी आपल्या बैलांना घेऊन मारूतीच्या मंदिरात जातात, आणि नंतर घरी नेऊन ओवाळण्यात येते. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' दिला जातो. पोळा श्रावण अमावस्या या तिथीला साजरा केला जातो. ज्यांच्याकडे शेती किंवा बैल नाहीत, ते मातीच्या बैलांची पूजा करतात.पोळयाच्या दिवशी बैलांना कामापासून विश्रांती असते. पहाटेच बैलांना नदीवर नेऊन आंघोळ घातली जाते. नंतर घरी आणून त्यांच्या पाठीवर सुरेख नक्षीकाम केलेली झूल टाकून त्यांच्या संपूर्ण अंगावर गेरूचे ठिपके लावले जातात. शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या आणि घुंगरांच्या माळा बांधल्या जातात. शेतकऱ्यांच्या घरी बैलांचे स्वागत करण्यासाठी सुवासिनी सडा व रांगोळ्या काढतात. 'पुरणपोळी, पाच भाजी' यांचा नैवेद्य तयार केला जातो. पोळा फुटल्यानंतर घरातील सुवासिनी बैलांची विधीवत पूजा करून त्यांना नैवेद्य देतात, आणि त्यांच्या पुढे गहू, ज्वारीचे दान मांडतात. गावातील इतर घरातूनही बैलांना जेवणासाठी आमंत्रित केले जाते. शेतकऱ्याला औक्षण करून नारळ दिला जातो.

## शंकरपूरमध्ये मकराचा पोळा

शंकरपूरमध्ये मकराचा पोळा भरविला जातो, जो सभोवतालच्या परिसरात प्रसिद्ध आहे. पोळ्याच्या दिवशी शंकरपूर येथील प्रतिष्ठित शेतकरी राजूभाऊ डहाके यांच्या घरून मकराचा बैल वाजत गाजत निघतो. त्याचे पाठोपाठ गावातील सर्व बैल जोड्या बाजाराच्या भव्य आवारात जमा होतात. मकराच्या बैलाचे पूजन करून मकराचा पोळा फुटतो. सर्व शेतकरी आपापल्या बैल जोडीला घरी नेऊन पूजा करून गोडधड खाऊ घालतात. दुसऱ्या दिवशी पोळ्याच्या पाडव्याला लहान मुलांसाठी ग्रामपंचायत शंकरपूर व तरुण पर्यावरणवादी मंडळ शंकरपूर यांच्या वतीने पोळा (नंदी पोळा) शंकरपूर बस स्टॉपवर भरविला जातो. लहान मुलं उत्साहाने पोळ्यात भाग घेतात, आणि मंडळाच्या वतीने स्पर्धकांना बक्षीस वाटप केले जाते.

## आज आवतन घे, उद्या जेवायला ये

पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना आमंत्रण (आवतन) देण्याची पद्धत आहे. पोळ्याच्या पहिल्या दिवशी सायंकाळी बैलांच्या खांद्याला हळद व तुपाने शेकले जाते, आणि त्यांना दुसऱ्या दिवशी म्हणजे पोळ्याला जेवणासाठी आमंत्रित केले जाते. या पद्धतीने 'आज आवतन घे, उद्या जेवायला ये' असा संदेश दिला जातो.

# वन विभागाला प्रत्येक क्षेत्रात 'नंबर वन' करा-वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

## नागपूरमध्ये महिला वन कर्मचारी व अधिकारी परिषदेचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यामध्ये असलेल्या एकूण सर्व विभागांपैकी सर्वात मोठी जबाबदारी वन विभागावर आहे. देशाच्या इतर राज्यांच्या तुलनेत वन विभागाचे सर्वाधिक बजेट महाराष्ट्राचे आहे. वन संवर्धन, संरक्षण हे ईश्वरीय कार्य आहे, यामध्ये 'आई' प्रमाणे अत्यंत निष्ठेने आणि जबाबदारीने काम करणाऱ्या महिला कर्मचारी व अधिकाऱ्यांचा अभिमान वाटतो. आता प्रत्येक क्षेत्रात वन विभागाला नंबर वन करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे या, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

सदर (नागपूर) येथील नियोजन भवन सभागृहात आयोजित महिला वन कर्मचारी व अधिकारी परिषदेत ते बोलत होते. वन विभागाद्वारे आयोजित महिला अधिकारी कर्मचारी यांच्या परिषदेला उपस्थित प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता विश्वास, प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. श्रीनिवास राव, मुख्य महाव्यवस्थापक एफडीसीएम संजीव गौड, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रवीण चव्हाण, नरेश झुरमुरे, कल्याणकुमार, मुख्य वनसंरक्षक अमरावती ज्योती बॅनर्जी, मुख्य वनसंरक्षक नागपूर श्री लक्ष्मी ए, वनसंरक्षक यवतमाळ वसंत घुले, फिल्ड डायरेक्टर आदर्श रेड्डी, विभागाचे अधिकारी, महिला अधिकारी व कर्मचारी आदींची यावेळी उपस्थिती होती.

मंत्री मुनगंटीवार म्हणाले, 'महाराष्ट्र शासनामध्ये प्रमुख पदांवर महिला अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. वनविभागाच्या प्रमुख पदीदेखील शोमिता विश्वास असल्याबाबत नामोल्लेख केला. याचा मनापासून आनंद झाला. महाराष्ट्र हा देशात सर्वाधिक हरितक्षेत्र असलेला प्रदेश असल्याचा अभिमान आहे. यासाठी आपल्यासारख्या महिला अधिकाऱ्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. वृक्ष लागवड असो, वन्यजीव संरक्षण असो की मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचे आव्हान,



वनविभागातील महिला अधिकारी आणि कर्मचारी कुठेही कमी पडलेल्या नाहीत. महिला म्हणून विशेष सवलत मिळविण्यापेक्षा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून तितक्याच गतीने काम करणाऱ्या वन विभागातील महिला कर्मचारी आणि अधिकारी निश्चितच सर्वांसाठी आदर्श आहेत.'

### हे तर ईश्वरीय कार्य

वनविभागाचे कार्य हे ईश्वरीय कार्य आहे. वनविभाग हा आमच्यासाठी एक केवळ विभाग नसून एक परिवार आहे. सर्वांनी परिवार समजून कार्य केले पाहिजे. महिला अधिकारी आणि कर्मचारी परिषदेमधून चर्चा आणि संवाद वाढावा यासाठी दरवर्षी अशा परिषदेचे आयोजन करावे. सोबतच महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी विभागीय स्तरावर व राज्यस्तरावर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशा सूचनाही वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

# करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना तुर कांदा पिकांचे विमा ताबडतोब देण्याची मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोयाबीन आणि कापूस पिकांच्या अनुदानाची ताबडतोब शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी अशी मागणी बळीराजा शेतकरी संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष श्री. अण्णासाहेब सुपनवर यांनी केली आहे. २०२२/२०२३ या वर्षातील खरीप हंगामातील पिक विमा सर्व शेतकऱ्यांनी भरला होता. तथापि, विमा कंपन्यांनी उडीद, मुग, बाजरी आणि मका या पिकांनाच विमा दिला आहे. त्याऐवजी, तुर आणि कांदा या पिकांना जाणून बुजून डावलण्यात आले आहे.

. सुपनवर यांनी सांगितले की, विमा कंपन्या मालामाल झाल्या असतानाही शेतकरी



अडचणीत आहे. केंद्र व राज्य सरकारने मोठी जाहिरात करून पंतप्रधान पिक विमा योजना एका रुपयामध्ये देणार असे सांगितले होते. परंतु, पिक विमा कंपन्यांनी तुर व कांदा पिकांना वगळले आहे.

सुपनवर यांनी इशारा दिला आहे की, बैलपोळा सणाच्या अगोदर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा न झाल्यास, बळीराजा शेतकरी संघटनेच्या वतीने विमा कंपन्यांच्या ऑफिससमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.या आंदोलनाच्या तयारीसाठी बळीराजा शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव बनकर, उपाध्यक्ष अनिल तेली, आजिनाथ इरकर, दादासाहेब महानवर, नवनाथ कोळेकर, निलेश कोकरे, भालचंद्र इवरे, कैलास पवार, तात्या काळे, बाळासाहेब माने, निलेश पडवळे, आणि देविदास तळेकर यांसह अनेक पदाधिकारीउपस्थितहोते

# सेवानिवृत्त शिक्षक यु.टी.देशमुख यांना शाळेचा भावपूर्ण निरोप

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

लोक विद्यालय सावरगावचे शिक्षक यु. टी. देशमुख यांना ३१ ऑगस्ट २०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात आले. या विशेष प्रसंगी त्यांच्या सन्मानार्थ विद्यालयात एक निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक कामडी आणि प्रमुख अतिथी म्हणून बालमवार उपस्थित होत्या. यु. टी. देशमुख यांना शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन शाळेच्या वतीने आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.




या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि इतर शालेय कर्मचारी उपस्थित होते. समारंभादरम्यान यु. टी.देशमुख यांच्या पुढील आयुष्याच्या सुख,आरोग्य आणि आनंदाच्या प्रार्थना करण्यात आल्या. तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभो,अशी प्रार्थना ईश्वरचरणी करण्यात आली.

# भाजप अल्पसंख्याक विभागाचे जावेद शेख यांचा शिवसेना (उबाठा) गटात प्रवेश

## जिल्हाप्रमुख तथा विधानसभा प्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वाखाली पक्षात नवा उत्साह

**वरोरा । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक विभागाचे वरोरा-भद्रावती विधानसभा अध्यक्ष जावेद शेख यांनी जिल्हाप्रमुख आणि वरोरा-भद्रावती विधानसभा प्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) पक्षात प्रवेश केला.

वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्रात मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.



शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना (उबाठा) गट नेहमी तत्पर आहे. जिवतोडे यांच्या प्रखर कार्यशैलीला पसंती देत जावेद शेख यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेना (उबाठा) गटात प्रवेश केला.

या वेळी शेख यांच्या सोबत अमीर पठाण, अफसर शेख, मोहित गुप्ता, आवेश बाहे, अमोल भोयर, रियाझ सय्यद, आणि मोहसीन शेख यांनीही पक्ष प्रवेश केला. या सोहळ्यात उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, युवासेना जिल्हा समन्वयक आणि माजी नगरसेवक दिनेश यादव, तालुका प्रमुख विपीन काकडे, शहर प्रमुख संदीप मेश्राम आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# वरोऱ्यात उधळणार पोळा सणाचा भव्य उत्सव



**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये शेतकऱ्यांद्वारे साजरा करण्यात येणारा पोळा सण, बैलांची कृतज्ञता आणि आदर व्यक्त करणारा एक खास सण आहे. हा सण श्रावण महिन्यातील पिठोरी अमावस्या दिवशी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. बैल, जे शेतीतील अनिवार्य घटक आहेत, त्यांना विशेष मान देण्यात येतो.

पोळ्याच्या आदल्या दिवशी, बैलांना नदीत किंवा ओढ्यात नेऊन त्यांना स्नान घालण्यात येते. स्नानानंतर, बैलांना घरी आणून त्यांच्या खांद्याला हळद, तुपा किंवा तेलाने शेकले जाते. त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेले झुल घालले जाते आणि शिंगांवर बेगड, डोक्यावर बाशिंग, गळ्यात कवड्या आणि घुंगराच्या मण्यांची सजावट केली जाते. त्यांना गोड पुरणपोळी आणि सुग्रास अन्नाचा नैवैद्य अर्पण केला जातो.

वरोऱ्यात, दत्त मंदिराच्या परिसरात पोळ्याच्या दिवशी विशेष उत्सवाचे आयोजन करण्यात येते. बाजार समितीच्या जवळील मंदिराच्या परिसरात, आकर्षक सजावटीसह बैल जोडींची स्पर्धा घेतली जाते. सर्वात आकर्षक सजावटीच्या बैलांना बक्षीस दिले जाते, आणि त्यांच्या मालकांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला जातो. यावर्षीच्या पोळ्यात, राजकीय नेत्यांनी आकर्षक बक्षीसांची घोषणा केली आहे, ज्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये अधिक उत्साह आहे.

पोळा सणाच्या दिवशी, बैलांची मिरवणूक गावाच्या सर्कशीतून जाऊन त्यांना विशेष सन्मान मिळवला जातो. गावच्या सीमेजवळच्या शेतावर आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. शेतकऱ्यांनी आपल्या बैलांचा खास सजावट केली आहे आणि त्यांना पोळ्याच्या मिरवणूकित भाग घेण्यासाठी सज्ज केले आहे.

या उत्सवाच्या माध्यमातून, शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. बैलपोळा, शेतकऱ्यांच्या परंपरेचा आणि कृतज्ञतेचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे, जो वरोऱ्यात दरवर्षी मोठ्या धूमधडाक्यात साजरा केला जातो. बैलांचे कामगार घरगडींच्या नवीन कपड्यांचे वितरण आणि बैलशाळा साजरीकरण यामुळे सणाचे महत्वआणिआनंदवाढतो.

# तळोधी पोलीस ठाण्यात नव्या पोलीस निरीक्षक म्हणून संगीता हेलोंडे रुजू

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.) येथील पोलीस ठाण्यात नव्या पोलीस निरीक्षक म्हणून संगीता हेलोंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी गुरुवारी, २९ ऑगस्ट रोजी पदभार स्वीकारला. त्याच वेळी, पूर्वीचे ठाणेदार अजितसिंग देवरे यांना पोलीस स्टेशनतर्फे शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन निरोप देण्यात आला.

महाराष्ट्रात होऊ घालणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात अनेक पोलीस अधिकारी वर्गाच्या बदली करण्यात आल्या आहेत. तळोधी



पोलीस स्टेशनवरील पोलीस निरीक्षक अजितसिंग देवरे यांची नागपूर येथे बदली करण्यात आली असून, त्यांच्या रिक्त पदावर संगीता हेलोंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तळोधी पोलीस ठाण्यात रुजू झालेल्या संगीता हेलोंडे यांना पहिल्या महिला पोलीस निरीक्षक म्हणून मान प्राप्त झाला आहे.

याप्रसंगी, तळोधी पत्रकार संघ आणि मनसे शाखा तळोधी (बा.)च्या वतीने संगीता हेलोंडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.या वेळी तळोधी पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेश बारसागडे,कोषाध्यक्ष पंढरीनाथ बांडे, सहसचिव तुलोपचंद गेडाम, सुभाष गजभे,योगेश्वर शेंडे,प्रणय बांगरे,निरंजन बोरकर आदी पत्रकार तसेच मनसेचे शहर अध्यक्ष दिनेश हजारे,बोरकर,गिरडकर आदी उपस्थित होते.

संगीता हेलोंडे यांनी त्यांच्या आगामी कार्यकाळात तळोधी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या ४२ गावांमध्ये शांतता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

# संविधान जागर यात्रेचे वर्ध्यात भव्य स्वागत

## देशाचे रक्षणकर्ते संविधान स्वसंरक्षणास समर्थ-विजय गव्हाळे

**वर्धा । प्रतिनिधी**

संविधानाच्या अमृत महोत्सव वर्षाच्या निमित्ताने संविधान जागर समितीच्या वतीने आयोजित संविधान जागर यात्रेचे वर्धा शहरात आगमन झाले. यावेळी भव्य स्वागत करण्यात आले. या यात्रेच्या वतीने काल भव्य सभेचे आयोजन केले होते. कार्यक्रमास समाजातील दलित वंचित घटकातील विचारवंत मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात आकाश अंभोरे यांनी उद्देशिका वाचनाने केली. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेली उद्देशिका वाचनाची खंत व्यक्त केली.

त्यानंतर, आपल्या भाषणात विजय गव्हाळे यांनी इंदिरा गांधी यांनी आणलेली हुकूमशाही घालवण्याचे काम आणीबाणी नंतरच्या केंद्रातील जनसंघाच्या पाठिंब्याच्या सरकारने केले, असे सांगितले. महाराष्ट्रात मुस्लिम समाजाकडून मागासवर्गीयांवर वारंवार हल्ले होत असल्याने, आता त्यांच्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. स्नेहा भालेराव यांनी नोकरीतील पदोन्नती व नवबौध्द आरक्षण इंदिरा गांधी यांनी रोखले होते. अटलजींनी याची सुरुवात केली होती आणि आरक्षण मुदतवाढ करणाऱ्या केंद्र सरकारचे अभिनंदन केले.ड़ राजेंद्र गायकवाड यांनी सांगितले की, भारत संविधानाच्या मार्गाने प्रगती करत राहिला तर बाबासाहेबांच्या म्हणण्यानुसार लवकरच महासत्तेच्या दिशेने वाटचाल करेल.

यात्रेच्या मुख्य भाषणामध्ये ड. वाल्मिकातात्या निकाळजे यांनी सांगितले की, भारतात आता संविधानिक राज्य आले आहे, त्यामुळे सर्वजण आपापले व्यवहार संविधानिक नियमांनी करीत आहेत. बाबासाहेबांनी इथले जुने कायदे सोडून संविधान स्वीकारायला सांगितले. मुस्लिम समाज अजून किती दिवस शरीयत




कायदे संविधानाच्या विरोधात चालवणार आहेत? मुस्लिमांमध्ये बाबासाहेब आंबेडकरांसारखा महापुरुष का जन्माला येत नाही? जर मुस्लिमांना संविधान स्वीकारणे जमणार नसेल, तर संविधान जागर समिती हे काम करेल.तसेच, बाबासाहेबांच्या मते देशाला सर्वाधिक धोका कम्युनिस्ट व समाजवादी लोकांकडून आहे, असे त्यांनी सांगितले.यात्रेत संविधान जागर समितीने कधीच न बदलणारे संविधान व त्याच्या हत्येचा प्रयत्न करणारी काँग्रेस या विषयाचे नवीन पुस्तक व मागील कालखंडात मुस्लिमांकडून दलित वंचितांवर झालेल्या अन्यायाच्या घटनांचा रिपोर्ट प्रकाशित केला.बौद्ध, मातंग, चर्मकार, खाटीक, वाल्मिकी व बुरुड अशा विविध समाजातील लोकांनी यात्रेला गर्दी केली. सभा संपताना सर्वांनी सामूहिकरित्या संविधान जागर गीत म्हटले व विषयांबाबत समाधान व्यक्त केले.सभेचे अध्यक्ष म्हणून विवेक विचार मंचचे नगर संयोजक वामनराव वागडे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन योजनाताई ठोकळे यांनी केले, तर जिल्हा संयोजक राहुल मुन यांनी आभार व्यक्त केले. आमदार पंकज भोयर, माजी खासदार रामदासजी तडस, प्रदीप ठाकूर यांची विशेष उपस्थिती होती.

जागर यात्रा स्वागत समितीचे अमित भित्रे, वैभव वागडे, शुभम कांबळे, प्रशांत अवचट, शाम शंभरकर, राजू मडावी, फकिरा खडसे, वसंत सोनावणे व इतर सामाजिक कार्यकर्त्यांनी सभेसाठी परिश्रम केले.

# रुग्णसेवेचे कार्य आयुष्यात सर्वोपरी-पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## दुर्गापूर येथे निःशुल्क महाआरोग्य शिबिराचे आयोजन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

माणसाला कितीही धनवान असू द्या, ताप आल्यावर अन्न सुद्धा कडू लागतं. नोटा आणि सोने पुढे ठेवले म्हणजे प्रकृती बरी होत नाही. त्यासाठी प्रकृती ठणठणीत ठेवण्याशिवाय पर्याय नाही. आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी अशा शिबिरांचे आणि डॉक्टरांचे मार्गदर्शन महत्वाचे आहे. आपले अध्यात्म आणि संस्कृती रुग्णसेवेची शिकवण देतात. त्यामुळे आयुष्यात रुग्णसेवेचे कार्य सर्वोपरी आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज (रविवारी) केले.
दुर्गापूर येथील सेंटमेरी हायस्कूल येथे निःशुल्क महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी श्री. मुनगंटीवार बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, आशा हॉस्पिटलचे डॉ. सौरव अग्रवाल, ओसेसर कँसर हॉस्पिटलचे डॉ. भोयर, शंकरा सुपर हॉस्पिटलचे डॉ. जितेंद्र यादव, आशा हॉस्पिटलचे जयहरी सिंग ठाकूर, कारमेल अकादमीचे प्रिन्सिपल फादर जॉयसेन, सेंट मेरीच्या सिस्टर टॉम्सी, वैद्यकीय अधिकारी कोमल मुनेश्वर, शासकीय कर्मचारी आदी उपस्थित होते.आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून रुग्णांवर यशस्वी उपचार झाल्यानंतर मिळणारा आनंद कुठल्याही आनंदापेक्षा मोठा आहे. रुग्णांद्वारे मिळणाऱ्या आशिर्वादातून जन्मोजन्मीची शक्ती प्राप्त होते. रुग्णसेवेचे हे पुण्य पुढच्या अनेक जन्मात कामी येईल, अशी भावनाही श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.जातीच्या, वंशाच्या, रंगाच्या पलीकडे जाऊन रुग्णसेवा केल्यास त्याचे कायम स्मरण राहते. ही सेवा आपल्या आयुष्यात बोनस पॉईंट ठरते. अशा सेवेसाठी आम्ही कायम पुढे असतो. या मतदारसंघात आरोग्य शिबीर, दिव्यांगांसाठी कार्यक्रम, गोरगरिबांची सेवा सातत्याने सुरु असते. संजय गांधी निराधार योजनेचे अनुदानही मी दुप्पट केले आहे,' असे मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले.राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून राज्यातील २ कोटी ४८ लाख मातांच्या खात्यात थेट १५०० रुपये जमा होत आहेत. या बहिणींची, त्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी म्हणून उत्पन्नाची अट देखील नाही. जीवनदायी योजनेमध्ये त्यांचा खर्च उचलण्याचा संकल्प आपण केला. शासनाच्या अशा कल्याणकारी योजनांमुळे राज्यातील 'स्त्री'ला कुणासमोर हात पसरायची वेळ आता येणार नाही. ती हिमतीने समाजात उभी राहू शकेल. आम्ही कधी, जाती, धर्म वंश पहिला नाही. आपला धर्म हा मानवतेचा धर्म असला पाहिजे,' असेही श्री. मुनगंटीवार म्हणाले.

### मुलांची मोफत हृदय शस्त्रक्रिया

लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रियेकरिता खाजगी रुग्णालयात १० लाख रुपये लागत असताना, या शस्त्रक्रिया मुंबईतील फोर्टीज हॉस्पिटलच्या चमूद्वारे मोफत करून देण्यात आल्या. २ ते १० वर्षांपर्यंतच्या ६० लहान मुलांचे ऑपरेशन करण्यात आले, याचाही त्यांनी उल्लेख केला. ऑपरेशननंतर मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद समाधान देणारा होता, अशी भावनाही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.रामपाल सिंग, हनुमान काकडे, अनिता भोयर, केमा रायपुरे, रोशनी खान, सर्व माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य आदी उपस्थित होते.

### जिल्ह्यात कर्करोग रुग्णालय

जिल्ह्यात आपण १४० खाटांचे कर्करोग रुग्णालय उभारत असून याचा उपयोग जिल्ह्यातील रुग्णांना होईल. एक धर्मशाळा देखील उभारण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. केवळ चंद्रपूर नव्हे तर परिसरातील प्रत्येकाला हे आरोग्य मंदिर वाटेल, अशी त्या मागची संकल्पना आहे, असेही ते म्हणाले.

### दिव्यांग, नेत्र रुग्णांची सेवा

मनापासून सेवा करण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे श्री. मुनगंटीवार म्हणाले. परिवारातील सदस्यांप्रमाणे रुग्णांची सेवा करत आहे. यापूर्वी, नेत्र चिकित्सा शिबीरातून ५० हजार रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. ५ हजारांपेक्षा जास्त मोतीबिंदू ऑपरेशन केले. ३५ हजारांहून अधिक चष्मे दिले, असेही ते आवर्जून म्हणाले.

# वरोऱ्यात धावली तरूणाई: वरोरा भद्रावती मॅरेथॉन २०२४ ने बदल घडवण्याचा संकल्प

**वरोरा । प्रतिनिधी**

प्रसिद्ध नेत्रचिकीत्सक डॉ. चेतन खुटेमाटे यांच्या चला बदल घडवूया उपक्रमांतर्गत वरोरा शहरात १ सप्टेंबर रोजी वरोरा भद्रावती मॅरेथॉन २०२४ आयोजित करण्यात आली. या मॅरेथॉनने आरोग्यविषयक जनजागृतीसाठी विशेष योगदान दिले.
सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सुरुवात झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील, १८ वर्षांखालील, आणि खुल्या गटातील स्त्री व पुरुषांसाठी प्रत्येकी ६ पारितोषिके देण्यात आली. एकूण ७३००० रुपयांच्या पारितोषिकांचा पुरस्कार मान्यवरांनी वितरित केला.




या स्पर्धेत २५२ स्त्री आणि ३४७ पुरुष धावपटूने सहभाग घेतला. २ किमी व ५ किमी अंतराच्या गटात धावपटूंचा उत्साह असलेल्या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या आरोग्याबद्दल जागरूकता वाढवली. पारितोषिक वितरण प्रसंगी डॉ. चेतन खुटेमाटे, मारोती मोरे, रूपलाल कावडे, खेमराज कुरेकार, प्रा. प्रविण खिरटकर, आणि डॉ. राठोड हे मान्यवर उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे महत्व स्पष्ट केले आणि पुढील काळात क्रीडा क्षेत्राचा विकास करण्याच्या योजना व्यक्त केल्या.आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्रा. तानाजी बायस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विविध क्रीडा स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# इंदापूर तालुका हिंदी अध्यापक संघाच्या अध्यक्षपदी शत्रुघ्न कानगुडे यांची निवड

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुका हिंदी अध्यापक संघाच्या अध्यक्षपदी श्री नारायण रामदास संस्थेचे शिक्षक, शत्रुघ्न कानगुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. केतकेश्वर हायस्कूल, निमगाव केतकी येथे संघाची बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये चालू शैक्षणिक वर्षासाठी संघाची कार्यकारिणी तयार करण्यात आली. यावेळी, १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिवस साजरा करण्यासाठी तालुक्यातील प्रत्येक हायस्कूलमध्ये हिंदी निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.नवीन अध्यक्षांचा सत्कार महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा हिंदी महामंडळाचे सदस्य यू. जे. मुलाणी यांनी केला. तसेच, उपाध्यक्ष एस. ए. गायकवाड यांचा सत्कार माजी उपाध्यक्ष रणमोडे यांनी केला. यावेळी,



इंदापूर तालुका हिंदी अध्यापक संघाचे प्रसिद्धी प्रमुख दत्तात्रय गवळी, तज्ञ संचालक वडापूरे , जिल्हा समन्वयक भोंग , आणि सचिव के. डी. भोंग यांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमात गाढवे , सोळसे , मचाले ,चव्हाण ,शेंडे निंबाळकर , नाईक , वाघ आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने पक्षाकडे पुलगाव देवळी विधानसभा उमेदवारीसाठी मागणी केली

## युवा नेता तुषार वाघ यांना उमेदवार म्हणून निवडण्याची मागणी

**पुलगाव । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या वाऱ्यामुळे प्रत्येक पक्षाचे नेते जनतेशी संपर्क साधण्यासाठी मैदानात उतरले आहेत. वर्धा जिल्ह्यातील पुलगाव देवळी विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचा पारंपरिक गड मानला जातो. याठिकाणी खिंडार पाडण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्षांची नजर पुलगाव देवळी विधानसभा मतदारसंघाकडे लागली आहे.
अशातच, महायुतीतील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसने पुलगाव येथील इंटक भवनमध्ये पत्रकार परिषद आयोजित केली. या परिषदेत पक्षाकडे युवा नेतृत्व तुषार वाघ यांना आमदारकीसाठी उमेदवार म्हणून निवडण्याची मागणी जिल्ह्यातील सर्व मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत केली. भाजपा आणि शिवसेनेने या मतदारसंघात निवडणूक




लढवली, पण त्यांना अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. सहकार क्षेत्रात राष्ट्रवादी काँग्रेसची चांगली पकड आहे आणि ग्रामीण भागात चांगले काम झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला या मतदारसंघात संधी द्यावी, अशी मागणी सर्व नेत्यांनी केली.
पुलगाव कॉटन मिल पूर्ववत सुरू होऊन त्याद्वारे लोकांना रोजगार मिळवावा, ही मागणी अजित पवार यांना करण्यात आली आहे, असे तुषार वाघ यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# तपस्वी जैन महासती उर्जाजी यांच्या उपस्थितीत पुलगाव येथे पर्युषण महोत्सवाला सुरुवात

## भगवान महावीरांच्या सजीवांना जगू द्या या संदेशाला अर्थ देणारा महान उत्सव

**पुलगाव । प्रतिनिधी**

महापर्वाधिराज सणांच्या शिरोमणी पर्युषण पर्वाच्या आगमनाने, मानवाने जाणूनबुजून केलेल्या कर्माच्या परिणामातून मुक्त होण्याचा उत्तम मार्ग म्हणजे क्षमा, नम्रता, करुणा आणि दया या भावनांचा अभ्यास करणे आहे. प्रत्येक सजीवाच्या दयाळूपणाचे पालन करून मनुष्याच्या दोषांवर विजय मिळवता येतो.
आठ दिवस चालणाऱ्या या पर्युषण पर्वाच्या पहिल्या दिवशी, पुलगावात विराजमान झालेल्या परात्पर तपस्वी, अत्यंत ज्ञानी आणि प्रखर उर्जेने परिपूर्ण असलेल्या महासती उर्जाजींनी प्रवचनांची मालिका सुरू करताना सांगितले की, आजपासून सुरू होणारा हा महान पर्व सर्व संत, भक्त आणि इतर जीवांना



आत्मकल्याणाचे कार्य करण्यास मदत करेल. पर्युषणाच्या उत्सवात आपण स्वतःला संयम, विनय आणि क्षमा या बंधनात बांधतो आणि कल्याणाचा मार्ग प्रशस्त करतो.
या सणाच्या माध्यमातून, अंतागद सूत्राचे पठण करताना, राजा श्रेणिकने आपल्या आईवरील अत्याचाराच्या वर्णनानंतर आपल्या वडिलांना मारल्याचे पाहून मुक्त होण्याचा विचार केला. त्याच्या वडिलांनी तुरुंगातून आणि त्यांच्या हातातील बेड्या कापण्याचे साधन पाहून, स्वतःची अंगठी विषप्राशन करून मृत्यूला आमंत्रित केले. या मृत्यूमुळे श्रेणिकचे मन बदलले आणि त्याने सर्व काही सोडून दिले, तसेच आपल्या जीवनात अहिंसेचा मार्ग स्वीकारला, हे परात्पर तपस्वी जंबुदीप स्वामींनी दिलेल्या दीक्षेतील वर्णनातून स्पष्ट झाले.

# महायुती सरकारच्या निषेधार्थ पुलगाव येथे 'जोडे मारो' आंदोलन

**पुलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यातील राजकोट येथे ८ महिन्यांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा राज्य सरकारच्या मार्गदर्शनात तयार करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले होते. मात्र, अलीकडच्या एका मामुली वाऱ्यामुळे तो पुतळा जमिनीवर पडून खंडित झाला. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आक्रोश व्यक्त करण्यात येत आहे. या निषेधाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या नेतृत्वात संपूर्ण राज्यभर 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले.
पुलगाव येथे नगरपालिकेसमोर या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये महायुती सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश सावरकर, अध्यक्ष सुनील ब्राम्हणकर, राष्ट्रवादीचे श्यामसुंदर देशमुख, शिवसेनेचे प्रशांत (बाळा) शहागडकर, राजू विरुळकर, मुन्ना शुक्ला, दिलीप




वलिवकर, नटवर चौबे, सुरेश गोतमारे, राजेंद्र रवाळे, अश्विन शहा, गोविंद दैया, डॉ. विजय राऊत, विजय भटकर, रमेश शर्मा, बंटी सोनी, मुस्ताक हुसेन, नीरज ढगे, गजानन पचारे, इमरान शेख, डेव्हिड जेकब, करामत भाई, रुपराव राऊत, गौतम गजभिये, किरण मलमकार आदी उपस्थित होते.या आंदोलनाच्या माध्यमातून सरकारच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, त्यांचा जाहीर निषेध करण्यात आला आहे.

## सोनोरा (ढोक) येथे पुराचे भीषण प्रमाण

# ८०-९० घरांमध्ये पाणी शिरले आश्वासनांचे फसवे धोरण

**पुलगाव । प्रतिनिधी**

सोनोरा (ढोक) गावात आलेल्या महापूरामुळे लेंडी नाला व लाडकी नदीचा रौद्ररूप पाहून गावातील ८०-९० घरांमध्ये रात्री १ च्या सुमारास पाणी शिरले. यामुळे गावकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली, आणि अनेकांनी दुसऱ्यांच्या घरात आश्रय घेतला. घरातील मौल्यवान वस्तू, धान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.
नायब तहसीलदार अजय झिले यांनी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी तातडीने गावात भेट दिली.
गेल्या अनेक वर्षांपासून सोनोरा येथे पावसाळ्यात लेंडी नाला व लाडकी नदीला पुर येतो. परंतु, यापूर्वी देखील तात्कालिक उपाययोजना करून विविध राजकीय नेते आश्वासन देतात. या आश्वासनांनंतर मात्र स्थिती पूर्ववतच राहते, आणि प्रत्येक पावसाळ्यात येणाऱ्या पुराच्या रौद्ररूपामुळे



गावकऱ्यांना तेच अनुभवायला लागते. या फसव्या आश्वासनांमुळे सोनोरा वासीयांचा शासकीय यंत्रणा व राजकीय नेत्यांवरील विश्वास कमी झाला आहे. आता सर्वांना सुबुद्धी देणारा परमेश्वरच एकटा उरलाय, अशी प्रार्थना गावकऱ्यांनी केली आहे.

# दत्तात्रय नाळे यांचे दु:खद निधन

दत्तात्रय सीताराम नाळे (वय ७६), रा. निलज, यांचे त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. दत्तात्रय नाळे हे अतिशय धार्मिक स्वभावाचे होते आणि त्यांच्या निधनाने परिवारासह संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. गोरख नाळे, रेवणनाथ नाळे आणि मंडोदरी यांचे ते वडील होते. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आणि समुदायामध्ये एक मोठा शोकसागर पसरला आहे.
त्यांच्या धार्मिक कार्यात आणि समाजसेवेत त्यांनी केलेल्या योगदानामुळे त्यांचे स्थान कधीच भरून येणार नाही. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो, हीच ईश्वरचरणीप्रार्थना.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# करमाळा विधानसभेवर भगवा फडकणारच-महेश चिवटे

**करमाळा | प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील स्वार्थी आणि लबाड पुढाऱ्यांनी आपल्या हितासाठी ठेकेदारांना मोठं करून सर्वसामान्यांची फसवणूक केली आहे. यामुळे आता एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली धनुष्यबाणावर करमाळा विधानसभा लढवून भगवा फडकवणारच, असा ठाम दावा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केला आहे.

बांधकाम कामगारांच्या ६०१ सदस्यांना भांडी वाटप आणि नोंदणी अर्ज भरून घेण्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात शिवसेनेच्या नेत्यांनी करमाळा तालुक्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमात गटविकास अधिकारी मनोज राऊत, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद फंड, भाजप व्यापारी आघाडीचे अध्यक्ष कुलकर्णी, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील, शहर प्रमुख संजय शीलवंत, महिला आघाडी उपाध्यक्ष ज्योतीताई शिंदे, शिवसेना ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुयश कर्चे, युवासेना जेऊर शहर प्रमुख माधव सूर्यवंशी, वैद्यकीय कक्ष प्रमुख नागेश शेंडगे यांसारखे शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.महेश चिवटे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना आणून प्रत्येक बहिणीला भाऊ म्हणून आधार दिला आहे. करमाळा तालुक्यात ४६,००० लाडकी बहिणींची नोंद झाली असून यापैकी ३४,००० बहिणींच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत. अजून किमान २५ ते ३० हजार लाडक्या बहिणींची नोंदणी बाकी असून त्यांना पुढील हप्त्यात थेट ४,५०० रुपये मिळणार आहेत. याशिवाय वयश्री योजनेमार्फत प्रत्येक वृद्धाला तीन हजार रुपये दिले जात आहेत.



चिवटे पुढे म्हणाले, एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी करमाळ्यातील शिवसेनेचा आमदार निवडून जाणे गरजेचे आहे. त्यामुळे शिवसेनेच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांना जो लाभ मिळाला आहे, त्यासाठी ते शिवसेनेच्या पाठीमागे उभे राहतील.प्राचार्य मिलिंद फंड यांनी त्यांच्या भाषणात राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या अफवांना बळी न पडण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, जोपर्यंत एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आहेत, तोपर्यंत लाडक्या बहिणींना महिना दीड हजार रुपये मिळणारच, उलट हा आकडा मेहनतीमुळे ३,००० रुपयांपर्यंत जाईल. त्यांनी सर्व महिलांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमात १,३०० नवीन बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली. शिवसेनेच्या वतीने यापूर्वी जवळपास २,७०० बांधकाम कामगारांना लाभ देण्यात आला आहे. वैद्यकीय मदत पक्षाच्या माध्यमातून तालुक्यातील रुग्णांना जवळपास दोन कोटी रुपयांची मदत झाली आहे.

महेश चिवटे यांचे सर्वसामान्यांसाठीचे कार्य आणि नेतृत्वामुळे ते सर्वसामान्यांचा आधार बनले आहेत. त्यामुळे त्यांना विधानसभेत पाठवण्यासाठी सर्व शिवसैनिकांनी आणि उपस्थित महिलांनी आजपासूनच कामाला लागावे, असे आवाहन शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्योतीताई शिंदे यांनी केले.महिला आघाडीच्या तालुका उपाध्यक्ष सुनीता गोडगे यांनी सांगितले की, करमाळा तालुक्यातील ४२,००० महिलांनी एकनाथ शिंदे यांच्या योजनेचा लाभ घेतला असून या सर्व महिला महेश चिवटे यांनाच मतदान करणार आहेत.

# मालवणच्या शिवपुतळ्याच्या दुर्घटनेवर युवासेनेची तीव्र प्रतिक्रिया

## ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**सोलापूर | प्रतिनिधी**

मालवण जिल्हा, सिंधुदुर्ग येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याच्या प्रकरणात युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) करमाळा तालुका समन्वयक कुमार माने यांच्या नेतृत्वाखाली करमाळा तहसील कार्यालयाचे तहसीलदार शिल्पा ठोकडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात या दुर्घटनेस जबाबदार ठेकेदारावर तात्काळ गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

मालवण येथील राजकोट परिसरात उभारण्यात आलेल्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण ४ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. मात्र, पुतळा अवघ्या सहा महिन्यात कोसळल्याने महाराष्ट्राची अस्मिता धुळीस मिळाली आहे, असे म्हटले जात आहे.



युवासेना आणि शिवसैनिकांनी या घटनेस जबाबदार असलेले अधिकारी, शिल्पकार, आणि ठेकेदार यांच्यावर कठोर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

याचवेळी बदलापूर जिल्हा ठाणे येथील शाळेतील चिमुरड्या मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली गेली. निवेदनात माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेवर गंभीर प्रतिक्रिया व्यक्त केली असून, आरोपीच्या कठोर दंडाची मागणी केली आहे. या निवेदनास शिवसेना उजिल्हाप्रमुख शाहु फरतडे, महिला आघाडी तालुका प्रमुख वर्षा चव्हाण, युवासेना तालुका प्रमुख शंभूराजे फरतडे, आणि इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केलेले हे विकासकार्य आपण दिलेल्या मतरूपी आशीर्वादाचे फलीत–आमदार किशोर जोरगेवार

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांनी पाच वर्षांतील विविध विकासकामांचे लोकार्पण कार्यक्रमांच्या धडाक्याचा आढावा घेतला. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या शेकडो कोटी रुपयांच्या विकासकामांचे आभार मानताना त्यांनी म्हणाले, आपण मला पाच वर्षांपूर्वी भरघोस मताधिक्य देऊन राज्याच्या सर्वोच्च सभागृहात पाठविले. आज आपण तयार केलेली समाजभवने आणि अभ्यासिका लोकांच्या उपयोगासाठी लोकार्पित करत आहोत. पाच वर्षांत झालेली ही विकासकामे, आपण दिलेल्या आशीर्वादाचे फलीत आहे.

आमदार किशोर जोरगेवार यांनी मागील तीन ते चार दिवसांत विविध लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रमांचा धडाका लावला. बाबूपेठ येथील तेली समाजाच्या इमारतीचे आणि खुले रंगमंचाचे भूमिपूजन, निर्मल नगरी येथील शेडचे बांधकाम, आणि निर्माण नगर येथील अभ्यासिकांचे लोकार्पण यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त, इंदिरा नगर येथील समाजभवनाचे लोकार्पणही त्यांच्या हस्ते करण्यात आले.




आमदार जोरगेवार यांनी अपक्ष म्हणून निवडून आल्यावर अनेक अडचणींचा सामना केला, तरीही लोकांनी दिलेल्या मताधिक्यामुळे काम करण्यास प्रेरणा मिळाली. मतदारसंघात ग्रामीण भागाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला. गरीब विद्यार्थ्यांना उत्तम सोयीसुविधा असलेल्या अभ्यासिकांमध्ये शिक्षण घेता येईल, यासाठी ११ अभ्यासिका तयार केल्या आहेत, असे ते म्हणाले.

यासोबतच, समाजभवने आणि मूलभूत सोयीसुविधांवर काम केले आहे. शहराच्या शेवटच्या भागात विकास पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. बाबूपेठ येथील ५० वर्षे जुनी रेल्वे उड्डाण पुलाची मागणी पूर्ण केली आहे. दीक्षाभूमीच्या विकासासाठी ५६ कोटी ९० लाख रुपयांचा निधी दिला आहे, असे ते पुढे म्हणाले.आमदार जोरगेवार यांनी इंदिरा नगर परिसरात समाजभवन उपलब्ध करून दिले असून, या भागातील इतर विकासकामेही पूर्ण केली आहेत. त्यांनी स्थानिक नागरिकांना समाजभवनाचा उपयोग समाज प्रबोधनासाठी करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मलकापूर शहरात गुन्हेगाराच्या विरोधात पोलिसांची कारवाई

## मनोजसिंग टाक फरार



**मोताळा | प्रतिनिधी**

मलकापूर शहरातील म्हाडा कॉलनीत ३१ ऑगस्ट रोजी रात्री १०.३० वाजता गंभीर घटनाक्रम उघडकीस आला. अट्टल गुन्हेगार मनोजसिंग सिकंदरसिंग टाकने शेजाऱ्यांशी वाद सुरू केला. पोलिसांना या वादाची माहिती मिळाल्यानंतर डीपी पथकातील अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तथापि, टाक घटनास्थळावरून झाडाझुडपात लपून गेला.

पोलिसांनी सर्च ऑपरेशन सुरू केले असता, टाक झाडाझुडपात लपलेला असल्याचे आढळले. त्याने तलवार घेऊन पोलिस उपनिरीक्षक सुनिल घुसळे यांच्यावर हल्ला केला, परंतु घुसळे यांनी त्या हल्ल्याला प्रतिकार केला. आत्मसंरक्षणासाठी, पोलिसांनी दोन राउंड हवेत गोळीबार केला, आणि एक राऊंड गुन्हेगारांच्या दिशेने टाकला. तथापि, अंधाराचा फायदा घेऊन टाक फरार होण्यात यशस्वी झाला.

घटनेच्या तपासात, नव्याने रुजू झालेले पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी घटनास्थळी भेट दिली आणि आरोपीच्या शोधासाठी मार्गदर्शन केले. या प्रकरणी, पोलिसांनी मनोजसिंग टाक विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवर मलकापूर शहरात मालमत्ता चोरी आणि शस्त्र अधिनियमांअंतर्गत अनेक गुन्हे दाखल आहेत. तपास पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे, आणि आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नेमण्यात आली आहेत.

## बैलपोळ्याच्या उत्साहात अनगरचा आठवडा बाजार सजला

# शेतकऱ्यांची सर्जा राजासाठी साहित्य खरेदीसाठी लगबग

मोहोळ तालुक्यातील अनगर येथील आठवडा बाजार बैलपोळ्याच्या साहित्याने सजून गेला आहे. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असणारा पोळा सण आता अगदी जवळ आल्याने गावातील बाजारपेठांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. अनगरच्या बाजारात सर्जा राजासाठी लागणाऱ्या विविध साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

चालू वर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. त्यामुळे बैलपोळा सण साजरा करण्यासाठी शेतकरी उत्सुक असून बाजारपेठेत साहित्य विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात माल विक्रीसाठी आणला आहे. अनगर येथील मागील गुरुवारच्या आठवडा बाजारात ग्रामीण भागातील व्यापाऱ्यांनी घुंगरू, झालर, दोरी, कवळी यांसारख्या वस्तू विक्रीसाठी आणल्या आहेत. यंदा शंभरपेक्षा जास्त विक्रेत्यांनी बाजारपेठेत सहभाग घेतला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा साहित्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे, मात्र या वाढलेल्या किमतींच्या पार्श्वभूमीवरही शेतकऱ्यांनी उत्साहाने खरेदी केली.



बापू घळके
मोहोळ



पोळा सण हा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलाला एक दिवस आराम मिळावा आणि त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सणाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला जातो. यंदा बाजारपेठेत लाखो रुपयांची उलाढाल होईल, अशी अपेक्षा विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.

> **प्रगतशील शेतकरी सुनील घाटुळे म्हणाले, आठवडा बाजारात दरवर्षीप्रमाणे यंदाही बैलांसाठी निरनिराळे गोंडे, पितळी साखळ्या, कासरे, सुती गोंडे, केसरी मनीमाळा, घुंगरे, कवडेमाळ, आणि तिरंगी माळांसारख्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. आपल्या सर्जा राजाला नजर लागू नये म्हणून काळ्या धाग्यात बनवलेली दिमटनी बाजारात दाखल झाली आहे. बैलजोडी सजविण्याचा खर्च हा कमीत कमी एक ते दोन हजार रुपयापर्यंत होतो.**

# ऊर्जानगर येथे राष्ट्रसंत ऑगस्ट क्रांतीपर्व स्मृतिदिन उत्साहात संपन्न

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

श्री गुरुदेव सेवा मंडळ, ऊर्जानगरने ३१ ऑगस्ट २०२४ रोजी ऑगस्ट क्रांतीपर्वाच्या स्मृतिदिनी एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. या दिवशी सामुदायिक प्रार्थनानंतर स्मृतिदिन कार्यक्रमाने सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रामदास तुमसरे (अध्यक्ष, श्री गुरुदेव सेवा मंडळ) यांनी भूषवले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आस्वले गुरुजी चिंचाळा (राष्ट्रसंत साहित्य अभ्यासक व रंगमुक्त होळी चळवळीचे प्रणेते), उद्घाटक ज्येष्ठ गुरुदेव उपासक मा. विठ्ठलराव देठे (भद्रावती), प्रमुख अतिथी राजेंद्र लांडे (अमरावती), सरस्वती धमाने (ज्येष्ठ उपासिका, वर्धा) आणि सविताताई हेडाऊ (अध्यक्ष, श्री गुरुदेव सेवा महिला मंडळ) उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. प्रमुख मार्गदर्शक आस्वले गुरुजी यांनी १८५७ च्या उठवाच्या संदर्भात दोन टोकाच्या भूमिका घेणाऱ्या गटांचा उल्लेख करताना सांगितले की, लोकमान्य बाल गंगाधर टिळक व महात्मा




गांधी यांनी क्रांतीची मशाल पेटवली. विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ओजस्वी भजनाद्वारे क्रांतीचे स्वरूप आणले. प्रमुख अतिथी राजेंद्र लांडे, सरस्वती धमाने आणि सविता हेडाऊ यांनी ऑगस्ट क्रांतीच्या स्मृतिदिनी विचार प्रकट केले. अध्यक्षीय भाषणात रामदास तुमसरे यांनी खेड्यात काम करण्याच्या महत्त्वावर जोर दिला आणि शिक्षक समाजाचा पाया असल्याचे नमूद केले. त्यांनी ऑगस्ट क्रांतीचे प्रणेते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज असले तरी लोकलढ्याचे कर्णधार लोक होते, हे सांगितले.कार्यक्रमाच्या आयोजकांनी महिलांना सन्मान दिला, आणि अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाद्वारे संचालित ग्रामगीता जीवन - विकास प्रवीण परीक्षा उत्तीर्ण उपासक व उपासिकांना प्रमाणपत्रे प्रदान केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशालीताई डूडूरे यांनी केले, तर प्रास्ताविक मालूताई कोंडेकर व आभार मनीषाताई दुर्गे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता ऑगस्ट क्रांतीतील शहिदांना श्रद्धांजली वाहून व राष्ट्रवंदनेने करण्यात आली. कार्यक्रमात चिंचाळा व ऊर्जानगर येथील बहुसंख्येने गुरुदेव सेवक, सेविका उपस्थित होते, असे देवराव कोंडेकर यांनी कळवले.

# पोळा सण: बैलांची कृतज्ञता व उत्साह

पोळा सण हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत उत्साहवर्धक असतो. हा सण विशेषतः श्रावण अमावस्या दिवशी साजरा केला जातो, ज्यामध्ये शेतकरी आपल्या बैलांना कृतज्ञता व्यक्त करतात.

बैलपोळा हा सण साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतातील कामे मोठ्या प्रमाणात बैलांवर अवलंबून असतात. त्यामुळे, शेतकऱ्यांसोबत शेतात वर्षभर राबणाऱ्या बैलांचा एक दिवस असावा म्हणून या दिवशी त्यांना विशेष सन्मान दिला जातो.

पोळ्याच्या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना शेतीतील कामे थांबवून आराम देतात. त्यांना नदीकिनारी घेऊन अंघोळ करून स्वच्छ केले जाते. शिंगांना रंग लावले जातात, फुगे बांधले जातात, पाठीवर गेरूची ठिपके ठेवली जातात आणि विविध चित्रे काढली जातात. बैलांच्या खांद्यावर हळद व तुपाने शिकले जाते. डोक्याला बाशिंग आणि गळ्यात घुंगरांची माला असे साजशृंगार करून बैलांना ग्रामदैवतेच्या मंदिरात घेऊन जातात.

फेरा मारल्यानंतर, शेतकरी बैलांना घरी आणतो आणि त्यांना गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा



नैवेद्य दाखवतो. शेतकरीही आनंदित होऊन बैलांना नैवेद्य दाखवून स्वतः अन्न ग्रहण करतो.

खानदेशातील सोनगीर गावातील शेतकरी दर मंगळवारी श्रावण महिन्यात बैलांच्या कामांचा आराम देण्याची परंपरा आजही कायम आहे. या दिवशी बैलांच्या कष्टांची कदर करत, शेतकरी त्यांच्या कामांची विश्रांती घेतात.

**–पुरुषोत्तम चिंतामण धनगर**

# गणेश चिवटेंच्या पाठीशी भाजपाची संपूर्ण ताकत उभी करणार-चेतनसिंह केदार सावंत



"एकीकडे करमाळा तालुक्यातील आजवरच्या राजकीय प्रस्थापित लोकांनी ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूकदार, कामगार यांच्या नावावर कर्ज काढून हजरो कुटुंबे देशोधडीला लावली तर दुसरीकडे गणेश चिवटे हे सर्वासामान्य माणसाच्या मागे खंबीरपने उभे राहत आहेत.त्यांना मदत करत आहेत.त्यामुळे लोकांच्या प्रश्नाची खरी जाण त्यांना असल्याने त्यांनी येणारी विधानसभा निवडणूक लढवावी.– **गणेश चिवटे.**"





"आज आपला तालुका शेजारील इंदापूर, बारामती या तालुक्याच्या दृष्टीने रोजगार,तंत्रज्ञान, शिक्षण व आरोग्य याबाबत खूप मागास आहे त्यामुळे दूरदृष्टीने काम उभे करावे लागेल.लोकांचे आशिर्वाद व त्यांचे प्रेम या बळावर मी आज ही लोकांची सेवा,मदत करू शकलो.भविष्यात याच लोकांच्या पाठिंब्यावर तालुक्यातील सामान्य लोकांच्या पाठीशी आणखी खंबीरपणे उभे राहण्याचे काम करणार आहे.– **नितीन झिंजाडे**"

**सोलापूर । प्रा.राजेश गायकवाड**

भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस तथा सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य यांच्या राजकीय भवितव्यासाठी भाजपा पक्षाची संपूर्ण ताकत उभी करणार असलेचे प्रतिपादन भाजपाचे सोलापूर (प) चे अध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले आहे.करमाळा तालुक्यातील मौजे मिरगाव्हाण येथील शेतकरी मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की,गणेश चिवटे हे हिंदुत्ववादी विचारावर चालणारा कार्यकर्ता असून गेल्या वीस वर्षात भाजपा पक्षाचे काम त्यांनी नेटाने उभे केले आहे. विविध सामाजिक उपक्रम, शैक्षणिक उपक्रम यासोबत दुग्धव्यावसायाच्या माध्यमातून हजरो कुटुंबांना त्यांनी रोजगाराचे साधन दिले आहे.त्यामुळे जनतेच्या मनात त्यांनी विश्वासाचे घर केले असून त्यांनी आता सक्रिय राजकारणात उतरले पाहिजेत अशी सर्वसामान्य लोकांची अपेक्षा गैर नाही.भाजपचा जिल्हाध्यक्ष म्हणून मी आपणास ग्वाही देतो की,गणेश चिवटे यांना आपल्याला अपेक्षित असणाऱ्या पदापेक्षाही मोठे पद मिळेल यासाठी पक्षाची संपूर्ण ताकत मी त्यांच्या पाठीशी उभी करेन असेही ते म्हणाले.यावेळी भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अमोल पवार म्हणाले की,गणेश चिवटे यांनी आजवर दुग्धव्यावसायासोबत,विद्यार्थी, निराधार लोकांना जेवणाची सोय करून दिली. सामुदायिक विवाह सोहळ्यातून शाही थाटात अनेकांची लग्न लावून दिली.बांधकाम कामगारांना अनेक योजना मिळवून दिल्या.मल्लासाठी निकाली कुस्त्यांची मैदाने भरवली अशी माहिती दिली.यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष बंडू शिंदे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे आयोजन मिरव्हाणचे माजी सरपंच मच्छिंद्र हाके व ग्रामपंचायत सदस्य नवनाथ खाडे यांनी केले होते.प्रस्ताविक खेलबा ठोंबरे यांनी केले,सूत्रसंचालन भाजपा जिल्हा चिटणीस विनोद महानावर यांनी केले तर आभार भाजपा सहकार सेलचे अजिनाथ सुरवसे यांनी मानले या कार्यक्रमासाठी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष पै.अफसर जाधव,तालुका अध्यक्ष रामभाऊ ढाणे,शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल,ता.सरचिटणीस काकासाहेब सरडे,बिटरगाव श्री गावचे माजी सरपंच डॉ.अभिजीत मुरुमकर,दादासाहेब देवकर,पांडे गावचे उपसरपंच नितीन निकम,किसान मोर्चा ता.अध्यक्ष सोमनाथ घाडगे,मकाई चे माजी संचालक हरिभाऊ झिंजाडे,नाना अनारसे,नामदेव भोगे,जयसिंग भोगे,आबा वीर,प्रदीप वीर,सुनील नेटके,मोहन नेटके,तुकाराम भोसले,अशोक सातपुते,विशाल घाडगे,अजय डवले,माणिक आप्पा निळ,लखन ढवळे,अतुल आतकरे,प्रकाश झोळ,संजय शेळके,सुशील थोरात,भारत पवार, अमोल पवार,संजय माने,गोरख भोगे,शशिराव भोगे,तात्या भोगे,विकास झोळ,बंडू सुरवसे,आबा वायसे,स्वप्नील घरबुडे,गणेश हाके,काका हाके,बाळू गोयकर,रवी खाडे,शहाजी हाके,पै.विठ्ठल हाके, काका शिंदे, रामा खाडे,औदुंबर घरबुडे,अमोल ओव्होळ,कृष्णा ओव्होळ,आबा ओव्होळ,बापू सुरवसे,धनराज सुरवसे,बालाजी वायसे,महादेव घरबुडे,रामदास लावंड,विठ्ठल पाटील, लक्ष्मण शिंदे,विकास हाके,संतोष भस्मे यासह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

## ५ महिन्याच्या लहान मुलाला रक्तदान करून तरुणाने निभावला माणुसकीचा धर्म

**जव्हार । प्रतिनिधी**

रक्तदान हे सर्वोत्तम दान मानले जाते आणि माणुसकीचा धर्म हा सर्वात मोठा धर्म आहे. जव्हार तालुक्यात एका ५ महिन्याच्या लहान बालकाला तात्काळ रक्ताची गरज असताना, एक तरुणाने माणुसकीचा धर्म निभावला.

व्हाट्सअँप ग्रुपवर एका लहान बालकाला रक्ताची तात्काळ गरज असल्याचा संदेश वाचल्यानंतर, विशाल घेगड नावाच्या तरुणाने कोणताही विचार न करता, गरीब-श्रीमंत, जात-पात यांचा भेद न ठेवता, जव्हार कुटीर रुग्णालय गाठले. त्याने ३ मिनिटांत हॉस्पिटलला पोहोचून रक्तदान केले. डॉक्टरांनीही वेळ न दवडता लगेचच बालकाला रक्त चढवले.



विशाल घेगडने रक्तदानानंतर मुलाच्या वडिलांना आर्थिक मदत दिली आणि शाब्दिक समर्थनही प्रदान केले. या प्रसंगातून विशालने माणुसकीचा धर्म अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने निभावला. सध्या ५ महिन्याचा लहान चिमुकला सुखरूप आहे आणि त्याच्या कुटुंबाने विशालला मनःपूर्वक आभार मानले आहेत.

विशालच्या या कृत्यामुळे माणुसकीचे खरं स्वरूप समोर आले आहे आणि मानवी संवेदनांची महत्त्वाची शिकवण मिळाली आहे.

## नारायण राणे व निलेश राणे यांच्या प्रतिमेस जोडे मारून संताप व्यक्त

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सिंधुदूर्ग येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या ८ महिन्यात कोसळला असून या घटनेचा शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्यावतीने आज १ सप्टेंबर रोजी सकाळी राहुरी फॅक्टरी येथे शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास दुग्धअभिषेक घालून दमबाजी करणाऱ्या नारायण राणे व निलेश राणे यांच्या प्रतिमेस जोडे मारून संताप व्यक्त केला.

शिवसेना जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे यांच्या प्रमुख उपस्थित तालुकाप्रमुख सचिन म्हसे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. प्रारंभी जय भवानी जय शिवाजी जय घोष करत छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक घालून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर नगर- मनमाड रस्ता अडवून नारायण राणे व निलेश राणे यांच्या प्रतिमेस जोडे मारून निषेध करण्यात आला.यावेळी सत्यम भोसले, हमीद पटेल, दत्तात्रय कडू, सुधीर झांबरे, सुनील शेलार, पोपट शिरसाठ, शहाजी वराळे, अनिल खपके, गणेश खेवरे, विलास खपके, रतन खुळे, विठ्ठल कोळसे, सचिन क्षीरसागर, गणेश जाधव, शर्फद्दीन पठाण, भारत मोरे, दिगंबर कदम, मधुकर म्हसे, सोमनाथ हारदे, काकासाहेब शिंदे, रोहित शिंदे, शाम नान्नोर, भरत धोत्रे, सोमनाथ लोंढे, मनीष देठे, दिगंबर कोहोकडे, अरविंद सोनवणे, अमोल कुऱ्हाडे, विठू राऊत आदिंसह शिवसैनिक उपस्थित होते.




## शेतकरी चिंतातूर: २ तासांच्या अखंड पावसा मुळे हिंगोली जिल्ह्यातील पिकांचे नुकसान

**हिंगोली । प्रतिनिधी**

३० ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता सुरू झालेल्या अखंड पावसामुळे हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. १२ तासांच्या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातील पिके नष्ट झाली असून, शेतकरी चिंतेत आहेत. पाऊस अजूनही थांबलेला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या उदरनिर्वाहाची चिंता वाढली आहे.

शेतकऱ्यांनी केलेली पेरणी आणि काढणीची तयारी यामध्ये आलेली पिके आता भूमिगत झाली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना काय करावे? हा प्रश्न पडला आहे. त्यांच्या हातातील पिके नष्ट झाल्यामुळे, पिकांना हमीभाव देण्याची मागणी करत आहेत, परंतु पिकेच उपलब्ध नसल्यामुळे भाव आणि नुकसानीसाठी जबाबदार कोण असावा, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.



शेतकऱ्यांना २०२२-२३ खरीप हंगामातील सोयाबीन आणि कापूस यासाठी अनुदान पीकविमा लाभ देखील मिळाला नाही. त्यामुळे भूमिगत झालेल्या पिकांचे संरक्षण कसे करायचे आणि कर्जमुक्ती कशी होईल, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

राज्य शासनाला शेतकऱ्यांच्या समस्यांची गभीरता समजून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे लागेल. पिकांचे नुकसान भरपाई मिळेल का, कर्जमुक्तीची घोषणा होईल का, या प्रश्नांची उत्तरे राज्य शासनाकडे शेतकरी वर्ग मागत आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी यासंबंधी विविध मागण्या करण्यात आल्यात.

## राज्य परिवहन विभागाच्या माळीवाडा बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम बुधवारपासून सुरू होणार

**दिवटे । प्रतिनिधी**

राज्य परिवहन विभागाने माळीवाडा बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम बुधवार, ४ सप्टेंबर २०२४ पासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पंढरपूर, सोलापूर, तुळजापूर, धुळे, नाशिक, कल्याण, श्रीरामपूर, संगमनेर आणि नेवासे मार्गावरील सर्व बसेस आता तारकपूर बस स्थानकावरून सोडल्या जातील, अशी माहिती तारकपूर आगार व्यवस्थापक अभिजीत चौधरी यांनी दिली.

राज्य परिवहन महामंडळाच्या इतिहासात माळीवाडा बस स्थानकाचे महत्त्वाचे स्थान आहे. नगरहून पुण्याला धावलेली पहिली बस तुकाराम पांडुरंग पठारे आणि लक्ष्मण केवटे यांनी चालवली होती. सुरुवातीला सरोज टाकी भागातून बसेस सोडल्या जात होत्या; परंतु नंतर राज्य परिवहन महामंडळाने माळीवाडा बस स्थानकातून सर्व बसेस सोडण्यास प्रारंभ केला. या स्थानकातून जिल्ह्याच्या कारभाराचे पर्यवेक्षण केले जात होते आणि विभागीय नियंत्रक कार्यालयही याच इमारतीत स्थित होते.माळीवाडा बस स्थानकाच्या पुनर्बांधणीच्या कामानंतर, या स्थानकातून फक्त तारकपूर, पारनेर, श्रीगोंदा, जामखेड, पाथर्डी आणि शेवगाव या ग्रामीण फेऱ्या मार्गस्थ होणार आहेत. विद्यार्थ्यांसाठी पास वितरण व्यवस्था आणि प्रवाशांसाठी संगणकीय आरक्षण प्रणाली ही वास्तविक बस स्थानकावरून कार्यान्वित राहणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी राज्य परिवहन महामंडळाला सहकार्य करण्याचे आवाहन एसटी प्रशासनाने केले आहे.




# जिजाऊ संस्थेच्यावतीने कोकण वर्षा मॅरेथॉन स्पर्धा आणि महिला मेळावा उत्साहात संपन्न

**जव्हार । प्रतिनिधी**

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था आणि जिजाऊ संघटनेच्या आयोजनाखाली, निलेश सांबरे यांच्या संकल्पनेतून कोकणातील सर्वात मोठी स्पर्धा *कोकण वर्षा मॅरेथॉन २०२४* मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेसाठी प्रसिद्ध अभिनेता ललित प्रभाकर यांनी प्रमुख उपस्थिती लावली होती.

पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील झडपोली येथे जिजाऊ नगरीत ०१ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता हजारो स्पर्धक, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि असंख्य प्रेक्षकांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कोकणातील सर्वात मोठी स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी ही मॅरेथॉन ९ वर्षांपूर्वी सुरु करण्यात आली होती.

या स्पर्धेचा मुख्य उद्देश स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थानिक मातीतल्या खेळाडूंचे नाव झळकवणे हा होता. जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था नेहमीच यासाठी काम करत असते. याच उद्देशाने राज्यभरातून धावपटूंना निमंत्रित करण्यात आले होते.

या वर्षी स्पर्धेचे १०वे वर्ष होते. यावेळी अभिनेता ललित प्रभाकर यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची भेट देत त्यांचे कौतुक केले. महिला मेळाव्याला जमलेल्या बहुसंख्य गर्दी पाहून त्यांनी निलेश सांबरे यांच्यावर असलेल्या असीम प्रेमाची भावना व्यक्त केली.



महिला मेळाव्यात ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने महिलांनी उपस्थिती लावली. मुख्य वक्त्या ड. वर्षा रोडे यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधत महिलांनी स्वतःला ओळखले पाहिजे, त्यांना अबला न मानता सबला समजून खंबीर राहावे, असे सांगितले.जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांनी महिला अत्याचारांच्या वाढत्या घटनांवर चिंता व्यक्त केली आणि समाजाच्या मानसिकतेचा गहरात विचार करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यांनी चांगली संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी समाजातल्या थोर महापुरुषांचा आदर्श ठेवण्याचे आवाहन केले आणि जिजाऊ संस्थेच्या समर्थनाची वचनबद्धता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी जिजाऊ संस्थेच्या मोफत युपीएससी / एमपीएससी अकादमीच्या माध्यमातून आयपीएस पदापर्यंत पोहोचलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी स्वप्नील माने, विक्रमगड तहसीलदार चारुशीला पवार, उद्योजक जयसुखभाई पटेल, पंकज राठोड, पोलिस निरीक्षक प्रदीप गिते आणि रविंद्र पानके यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रमात उत्साह आणि प्रेरणा यांची कसरत होती, ज्यामुळे जिजाऊ संस्थेच्या उपक्रमांना नवीन उंची मिळाली आहे.